# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# सोमवार, दिनांक १५ जुलै २०२४

## ठळक बातम्या

- **महाराष्ट्र शासनाने वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना केली असून याचं मुख्यालय पंढरपूर इथंच राहणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा.**
- **राज्यातील सर्व धर्मीयांमधील ज्येष्ठ नागरिकांना महत्वाच्या तीर्थक्षेत्रांची मोफत यात्रा करण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन' योजनेचा शासन निर्णय प्रसिद्‌ध.**
- **मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून तापलेलं वातावरण निवळण्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुढाकार घेण्याची मंत्री छगन भुजबळ यांची विनंती.**
- **विविध मागण्यांसाठी आजपासून महसूल कर्मचारी संघटनेचा राज्यभर बेमुदत बंद.**
- **आकाशवाणी नागपूरच्या उद्‌या साजरा होणाऱ्या 77 व्या स्थापना दिनानिमित्त 585 किलो हर्ट्‌जवर 'मध्यम लहरी' या विशेष कार्यक्रमाची प्रस्तुती.**

****

स्वतंत्र वारकरी महामंडळ

महाराष्ट्र शासनाने वारकऱ्यांसाठी स्वतंत्र वारकरी महामंडळाची स्थापना केलीअसून याचं मुख्यालय पंढरपूर इथंच राहणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीपंढरपूरात केली. ते काल पंढरपूरात आषाढी वारीच्या आढावा बैठकीत बोलतहोते. यावेळी मंत्री मंडळातले इतर सहकारी आणि अधिकारी उपस्थितहोते. पंढरपूर शहराचा सर्वंकष विकास आराखडा त्वरित सादरकरावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या. विठ्ठलरुक्मिणीच्या दर्शनासाठी व्हीआयपी लोकांपेक्षा वारकरी, शेतकरीआणि कष्टकऱ्यांनाच प्राधान्य राहील, त्याचप्रमाणे प्रत्येक दिंडीसाठीघोषित केलेले २० हजार रुपये त्यांच्या बँक खात्यावर वितरीत झाल्याचंही त्यांनी सांगितलं.पंढरपूर इथं येणाऱ्या वारकऱ्यांना यावर्षी पाणी आणि फळांच्या रसाचं मोफतवाटप करणार आहे. या ठिकाणीस्वच्छता राहावी, अशी व्यवस्था करण्याचे आदेशही त्यांनी यावेळी दिले. पंढरपूरात नेहमी हजारो नागरिक दर्शनासाठी

येतात,त्यामुळे १हजार बेडच्या नवीन रुग्णालयासाठी स्वतंत्र प्रस्ताव आरोग्यविभागानं तात्काळ सादर करण्याचं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना

राज्यातील सर्व धर्मीयांमधील 60 वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना" राबवण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोषणा केली होती. त्यानुसार या योजनेचा शासन निर्णय काल सामाजिक न्याय विभागानं प्रसिद्ध केला आहे. भारतातील एकूण 73 व महाराष्ट्र राज्यातील 66 तीर्थक्षेत्रांचा योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. या योजने अंतर्गत निर्धारित तीर्थक्षेत्रांपैकी एका यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एक वेळ लाभ मिळणार आहे, तसेच प्रवास खर्चासाठी कमाल मर्यादा प्रतिव्यक्ती 30 हजार रुपये इतकी राहणार आहे. वार्षिक उत्पन्न मर्यादा अडीच लाख असणाऱ्यालाच या योजनेचा लाभ उचलता येईल. यासाठी ऑनलाइन अर्ज सादर करावे लागणार आहेत. प्रवाशांची निवड जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात कोटा निश्चित करण्यात येऊन प्राप्त झालेल्या अर्जांच्या उपलब्धतेनुसार लॉटरी द्वारे प्रवाशांची निवड करण्यात येणार आहे. 75 वर्षावरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यक यापैकी एकाला सोबत नेण्याची परवानगी असेल.

मंत्री छगन भुजबळ

मराठा आणि ओबीसी आरक्षणावरून राज्यात तयार झालेला तणाव निवळण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घ्यावा, असं आपण त्यांना सांगितल्याचं मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितलं. शरद पवार यांची त्यांच्या मुंबईतल्या निवासस्थानी भेट घेतल्यानंतर भुजबळ वार्ताहरांशी बोलत होते. भेटीमागे कोणताही राजकीय हेतू नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. येत्या दोन दिवसांत आपण या विषयावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करू, तसंच राज्यातल्या प्रमुख नेत्यांशी चर्चा करून हा प्रश्न कसा सोडवता येईल ते पाहू, असं पवार यांनी म्हटल्याचं भुजबळ यांनी सांगितलं.

जयंत पाटील

महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा आणण्यामागे, शहरी नक्षलवादाच्या नावाखाली पुरोगामी चळवळींना लक्ष्य करण्याचा सरकारचा उद्देश असल्याची टीका, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. समाज माध्यमावरील संदेशात त्यांनी हे मत व्यक्त केलं आहे. कोणताही कायदा करतांना, त्यावर विधी आयोगाकडून मत घेणं, जनतेकडून आणि तज्ज्ञांकडून अभिप्राय घेणं

आणि विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात त्यावर सखोल चर्चा होणे अशी प्रक्रिया असतांना सरकार कोणालाही न जुमानता हा पाशवी कायदा अध्यादेशाद्वारे आणत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. हे विधेयक घटनाविरोधी असून सर्व विरोधी पक्षांचा या विधेयकाला पूर्णपणे विरोध आहे असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

भाजपची संवाद यात्रा

विधानसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी १९ नेत्यांच्या नेतृत्त्वातील संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यातील कानाकोपऱ्यात पोहचणार असल्याची माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. येत्या २१ जुलै रोजी पुणे इथं महाराष्ट्रातील पाच हजार भाजपा पदाधिकाऱ्यांचे अधिवेशन होणार असून त्यात नेते केंद्रीय मंत्री अमित शाह, नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संवाद यात्रेविषयी अंतिम रूपरेषा तसेच तारीख पक्की होणार आहे. आज नागपुरातील कोराडी इथं वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींशी ते बोलत होते.

एफआरपी

दुधाला प्रति लिटर ४० रुपये भाव तसंच रास्त आणि किफायतशीर दर- एफआरपी देण्याच्या प्रमुख मागणीसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीनं राज्यभरात आजपासून २१ जुलै पर्यंत तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे. शेतकरी संघर्ष समितीचे समन्वयक अजित नवले यांनी ही माहिती दिली.

महागाई दर

देशात अन्नधान्य, विशेषतः भाज्या आणि उत्पादित वस्तूंच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे घाऊक बाजारपेठेतली महागाई वाढून जून महिन्यात ३ पूर्णांक ३६ शतांश टक्क्यांवर गेली आहे. यात सलग चौथ्या महिन्यात वाढ नोंदवण्यात आली. ही महागाई मे महिन्यात २ पूर्णांक ६१ शतांश टक्के इतकी होती.

गोंड गोवारी

गोंड गोवारी समाजाच्या निवेदनांवर अभ्यास करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेली समिती उद्या नागपुरात सिविल लाईन्स स्थित रवी भवन इथं महसूल विभागात गोंड गोवारी समाजाच्या संघटनांच्या प्रतिनिधींची लेखी निवेदनं स्वीकारणार आहे. यावेळी संबंधित संघटनांच्या प्रतिनिधींना आपलं म्हणणं मांडण्याची संधी देण्यात येणार आहे. या संधीचा लाभ घेण्याचं आवाहन आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था आयुक्त डॉक्टर राजेंद्र भारूड यांनी केलं आहे. याशिवाय अमरावती विभागात दिनांक १८ ते २० या कालावधी दरम्यान शासकीय विश्रामगृह इथं या संदर्भात निवेदने स्वीकारली जातील.

महसूल कर्मचारी संघटना

राज्यभर महसूल कर्मचारी संघटनेने आपल्या विविध तेरा मागण्यासाठी आजपासून बेमुदत बंद आंदोलन सुरू केलं  आहे. 15 जुलैपासून संघटना सदस्यांनी बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी आंदोलनादरम्यान जोरदार नारेबाजी केली. गेली काही वर्षे महसूल कर्मचारी संघटना आपल्या विविध मागण्यांसाठी शासनाकडे पाठपुरावा करत आहे. मात्र महसूल यंत्रणेचा कणा असलेल्या या कर्मचाऱ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. अशा स्थितीत रिक्त पदांसंदर्भात आकृतीबंध लागू करा. नायब तहसीलदारांच्या वेतनश्रेणी संदर्भातले निर्णय तातडीने घ्या. यासह विविध तेरा मागण्यासाठी हे आंदोलन सुरू झालं  आहे.

आकाशवाणी स्थापना दिवस

आकाशवाणीचे नागपूर केंद्र उद्या 16 जुलै रोजी आपला 77 वा स्थापना दिवस साजरा करणार आहे. या  स्थापना दिनानिमित्त 585 किलो हर्ट्ज वर  सकाळी सव्वा दहा वाजता पंधरा मिनिटांचा 'मध्यम लहरी' नामक विशेष कार्यक्रम प्रसारित होईल. 16 जुलै 1948 रोजी आकाशवाणीच्या नागपूर केंद्राचं पहिलं प्रसारण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या खंजिरी भजनानं सुरु करण्यात आलं होतं. तेव्हापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत देखील विविध कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून आकाशवाणी नागपूरची वाटचाल नेत्र दीपक राहिली आहे. यानिमित्त कार्यालयात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

जागतिक युवा कौशल्य दिन

आज जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त नाशिकमध्ये पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात ७०० शिकाऊ उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच १७ अनुकंपाधारकांना देखील  भुसे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आल . यावेळी वल्ड' स्कील कॉपींटिशनमध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा सत्कारही करण्यात आला. 'शांतता आणि विकासासाठी युवा कौशल्य' हि यंदाच्या जागतिक युवा कौशल्य दिनाची संकल्पना आहे. सण २०१४ पासून जागतिक स्तरावर हा दिवस साजरा केला जातो. युवकांमध्ये कौशल्यप्रती जाणीव जागृती करणं हा या दिवसाचा उद्देश आहे.

आकांक्षीत तालुका

वर्धा जिल्ह्यातील आकांक्षित कारंजा तालुक्यातील सारवाडी कन्नमवार बिट येथील महिलांना मुख्यमंत्री  माझी  लाडकी  बहीण  योजनेची  माहिती  व्हावी, यासाठी आज आमसभा आयोजित करून योजनेची माहिती देण्यात आली.

हवामान

हवामान खात्याने आज यवतमाळ, अमरावती आणि वर्धा साठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तर संपूर्ण विदर्भासाठी येल्लो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान आज गडचिरोली आणि वाशीम जिल्ह्यात दिवसभर ढगाळ वातावरण राहील. मात्र पावसाची नोंद झाली नाही. तर अमरावती जिल्ह्यात काही भागात हलका पाऊस बरसत आहे. आज नागपुर जिल्ह्यात सुद्‌धा दिवसभर ढगाळ वातावरण असून काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसत आहे. दरम्यान अमरावती जिल्ह्यात दर्यापूर तालुक्यातील नालवाडा येथे काल झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे शेती जलमय झाल्याने शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान आहे.

नागपूरात देखील भगवान जगन्नाथ रथयात्रा

पुरीप्रमाणे नागपुरात देखील भगवान जगन्नाथ यांची काल रथयात्रा काढण्यात आली. नागपुरातील प्राचीन जगन्नाथ स्वामी मंदिर रामपेठ येथून भगवान जगन्नाथ, भाई बलभद्र आणि बहीण सुभद्रा यांची रथयात्रा काढण्यात आली. यावेळी बँड पथकासह, टाळ मृदुंगच्या गजरात, जय जगन्नाथच्या घोषणांनी परिसर दुमदुमला.

*****